MHKO070011092023

# नियमीत दिवाणी दावा क्र. १३०/२०२३

## आक्काताई उर्फ पार्वती तेली – वि. – श्री प्रकाश कोळी व आणखीन

## <u>निशाणी १३ वर आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार, वादीने प्रस्तुतचा दावा कायम मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दोघा प्रतिवादींनी प्रकरणात हजर होवून निशाणी क्र.१२ वर कैफीयत दाखल केली आहे. सदर कैफीयतीचे अवलोकन केले असता वादीला समजून आले की, दाव्यामध्ये दावा मिळकत गट क्र.२१७६ चे क्षेत्र ० हे ७९ आर असे नमूद झालेले आहे. सदर चुकीचे क्षेत्र हे नजरचुकीने व टंकलेखनाच्या चुकीमुळे नमूद झाले आहे. त्या ऐवजी दाव्यामध्ये दावा मिळकत गट क्र.२१७६ चे क्षेत्र "० हे. ७९ आर." ऐवजी "० हे. ९३ आर." असे नमूद होणे आवश्यक आहे. वादीने सदरची दुरुस्ती ही औपचारिक स्वरुपाची असल्याचे कथन करुन सदर दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

०३. प्रतिवादींनी निशाणी क्र.१४ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीने जाणीवपूर्वक दाव्यामध्ये चुकीचे क्षेत्र नमूद कलेले आहे. सदर क्षेत्र हे वादीच्या मालकीचे नसल्यामुळे त्या क्षेत्राबाबत वादीस वाद व हक्क उपस्थित करण्याचा अधिकार राहत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०४. दावा व प्रस्तुत अर्ज यांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा दावा हा वादीने कायम मनाई ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाचे

तसेच दाव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, गट नं. २१७६ याचे क्षेत्रफळ "० हे. ९३ आर." ऐवजी "० हे. ७९ आर." असे नजरचुकीने व टंकलेखनाच्या चुकीमुळे टंकलिखीत झालेले असून सदर दुरुस्ती ही औपचारिक स्वरुपाची आहे. प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिज्ञापत्रावर दाखल केलेला आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. सदर दुरुस्ती ही प्रस्तुत दाव्याच्या अंतिम निर्णय गुणावगुणावर करण्यासाठी महत्त्वाची आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसाच्या आत करावी.

GAIKWAD RENUKA DATTATRAYA

Digitally signed by GAIKWAD RENUKA DATTATRAYA
Date: 2024.09.03 17:48:07 +0530

ठिकाण – जयसिंगपूर.
दिनांक – ०३/०९/२०२४

( **श्रीमती रेणुका द. गायकवाड** )
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.